RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

Volume - 75 | Issue- 62 | Marathi Daily | Thursday 29/10/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3



विशेष संपादकीय

निकालांचा अर्थ काय?

ज्ञानेश कुलकर्णी

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुका हा नेहमीच राजकीय विश्लेषकांसाठी एक अभ्यासाचा विषय राहिला आहे. सर्वसामान्य सार्वत्रिक निवडणुकांपेक्षा या निवडणुकांचे स्वरूप, त्यांची रचना आणि मतदारांची जातकुळी पूर्णपणे वेगळी असते. येथे मतदार अशिक्षित नसतो, कुठल्याही तात्कालिक घोषणांना किंवा भावनिक आवाहनांना लगेच बळी पडत नाही; उलट, आर्थिक स्थिती, रोजगार, महागाई, जुनी पेन्शन योजना (ओपीएस), शिक्षकांचे प्रश्न आणि प्रादेशिक अस्मिता यावर टोकदार विचार करतो. चार राज्यांमध्ये (महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार) पार पडलेल्या या निवडणुकांचे निकाल समोर आल्यानंतर देशातील मुख्य राजकीय पक्षांना मिळालेला संदेश अत्यंत परखड आणि कठोर आहे. सर्वात मोठा धक्का भारतीय जनता पक्षाला बसला आहे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ हे जनसंघ आणि त्यानंतर भाजपचे अभेद्य बालेकिल्ले मानले गेले. नागपूरसारखा संघ मुख्यालयाचा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा बालेकिल्ला असो किंवा विद्यमान प्रदेश नेतृत्वाचा प्रभाव असणारे पुणे असो; या मतदारसंघांवर भाजपचा एकाधिकार मानला जात होता. उत्तर प्रदेशमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संसदीय मतदारसंघ असलेले वाराणसी असो वा भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाशी संबंधीत मतदारसंघ; तिथे सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांना पराभवाचा किंवा अनपेक्षित पिछाडीचा सामना करावा लागणे, ही साधी घटना नाही. भाजपसाठी हा पराभव केवळ एका जागेचा नाही, तर त्यांच्या विचारसरणीला निष्ठावंत मानल्या गेलेल्या पांढरपेशा, सुशिक्षित आणि नोकरदार वर्गाच्या भ्रमनिरासाचे हे लक्षण आहे. कर्नाटकमधील निकाल तर काँग्रेसच्या नेतृत्वाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे. या राज्यात काँग्रेसचे बहुमताचे सरकार आहे. मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांची मजबूत पकड मानली जाते. गॅरंटी योजनांचा गाजावाजा देशपातळीवर केला जातो. असे असतानाही कर्नाटकमध्ये काँग्रेसला भोपळाही फोडता आला नाही. तिथे भाजप आणि एच. डी. देवेगौडा–कुमारस्वामी यांच्या धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या (जेडीएस) राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) चारही जागांवर दणदणीत विजय मिळवून काँग्रेसचा सुपडा साफ केला. सत्ता हातात असून, सरकारी यंत्रणा दिमतीला असून आणि प्रत्यक्ष मतपत्रिकांवर मतदान होऊनही मतदारांनी काँग्रेसला नाकारले. यावरून स्पष्ट होते, (पान २ वर)

ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश

जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग मोकळा!

नवी दिल्ली, दि.२९– नगर जिल्हा परिषदेसह महाराष्ट्र राज्यातील रखडलेल्या २० जिल्हा परिषद आणि २२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून, गेल्या अनेक महिन्यांपासून लांबणीवर पडलेल्या निवडणुकांचा बिगुल लवकरच वाजणार आहे.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, निवडणुका घेताना इतर मागासवर्गीय (ओबीसी), अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) यांचे एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होता कामा नये. मे २०२५ मध्ये न्यायालयाने बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वीच्या चौकटीनुसार निवडणुका घेण्याचे संकेत दिले होते; परंतु काही जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची एकूण टक्केवारी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडत असल्याने कायदेशीर पेच निर्माण झाला होता. यावर न्यायालयाने आरक्षणाची कमाल मर्यादा सांभाळूनच प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतींची पदे रिक्त असल्याने ग्रामीण जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी थेट लोकप्रतिनिधी उपलब्ध नव्हते. ग्रामीण भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, प्राथमिक शिक्षण आणि शेतीविषयक विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी पूर्णपणे सनदी अधिकाऱ्यांच्या हाताखाली चालू होती. यामुळे स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेला गती मिळत नव्हती. निवडणुका लांबल्यामुळे गावपातळीवरील आणि तालुकापातळीवरील राजकीय कार्यकर्ते हवालदील झाले होते. आता या निर्णयामुळे ग्रामीण महाराष्ट्रात पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग आला आहे. येत्या काही महिन्यांत २० जिल्हा परिषदा आणि २२५ पंचायत समित्यांमध्ये निवडणुकीचा धुराळा उडणार हे आता निश्चित मानले जात आहे.

गुन्ह्यात ५६ आरोपी निष्पन्न; २३ जण अटकेत

एमडी ड्रग्ज प्रकरण; आरोपींचे जामीन फेटाळले

समाचार/नगर-दि.२९

शहरातील एमडी ड्रग्ज (मॅफेड्रॉन) प्रकरणातील आरोपींचे न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने दि. २० जुलै २०२६ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत ३६,३९,८७४ रूपये किंमतीचे मॅफेड्रॉन (एमडी) विक्री करण्याचे उद्देशाने बाळगताना तसेच रबरी मुखवटे, चाकु, हॅण्डग्लोज, दोरी, पान्हे, प्लॅस्टीक पिस्टल यासारखे हत्यारे बाळगून अपहरण व दरोडा घालण्याचे तयारीत असताना आरोपींना पकडले होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशनला बीएनएस ३१० (४), ३१० (५), ३१३ सह भारतीय शस्त्र अधिनियमचे कलम ४/२५ सह एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचा प्राथमिक तपास तोफखाना पोलिसांनी करून तपासात १० आरोपी निष्पन्न करून ७ जणांना अटक केली. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी सदरचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे,यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदिप दरवडे, पोलीस (पान ३ वर)

उठाठेव

– विवेक मेहेत्रे

अहो, आपल्यावर कितीही आरोप झाले तरी घाबरायचं नसतं. देशभर प्रसिध्दी मिळाली याचाच आनंद मानायचा असतो!!

कोपरगाव, राहुरीत छापे; १० लाखाचा साठा जप्त

सणाच्या पार्श्वभूमीवर एफडीए ॲक्टिव्ह मोडवर!

समाचार/नगर-दि.२९

सण–उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत येथील अन्न व औषध प्रशासनाने कोपरगाव आणि राहुरी येथे तीन ठिकाणी छापे टाकून खाद्यतेल आणि मसाल्यांचा सुमारे १० लाख रूपयांचा साठा जप्त केला. या साठ्याचा दर्जा निकृष्ट असल्याचा संशय असून, काही उत्पादनांवर लेबलिंगसंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले आहे. तसेच काही साठ्याची साठवणूक अस्वच्छ परिस्थितीत केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे, सहआयुक्त (अन्न) एम. यू. माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त (अन्न) ए. ए. भोईटे, अन्न सुरक्षा अधिकारी के. डी. जगदाळे आणि यू. आर. पाटील यांनी ही कारवाई केली. ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, तसेच आगामी सण–उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. कोपरगाव येथे मंगळवारी (२७ ऑक्टोबर) रिनाज मसाला ड्रायफ्रूट अँड राइस सेंटर येथे तपासणी करण्यात आली. या कारवाईत ए. ए. स्पाइसेस या ब्रँडचा ५२ हजार ८०० रूपये किंमतीचा ८८ किलो मिश्रित मसाला पावडर (सालन मसाला) जप्त करण्यात आला. तसेच सात्विक ब्रँडची ६८ हजार ४०० रूपये किंमतीची १७१ किलो विशेष तिखट पावडर जप्त करण्यात आली. लेबलिंगमधील त्रुटी, निकृष्ट दर्जाचा (पान ३ वर)

निवडक

गोकुळ अध्यक्षाची निवड लांबणीवर

कोल्हापूर, दि.२९– दूध संघाच्या अध्यक्षपदाची आज होणारी बहुप्रतिक्षित निवड प्रक्रिया अखेर बारगळली आहे. महायुतीच्या सर्व १२ संचालकांनी सभेवर बहिष्कार टाकत गैरहजर राहण्याचा पवित्रा घेतल्यामुळे आवश्यक १४ संचालकांचा कोरम पूर्ण होऊ शकली नाही. परिणामी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ही विशेष सभा तहकूब केली. महायुतीने टाकलेल्या या राजकीय व तांत्रिक पेचामुळे आमदार सतेज पाटील यांच्या पॅनेलची मोठी कोंडी झाली असून, गोकुळच्या नव्या कारभाऱ्याची निवड आता लांबणीवर पडली आहे. गोकुळ दूध संघाच्या अध्यक्ष निवडीसाठी नवनिर्वाचित संचालकांची पहिली विशेष सभा आज सकाळी ११ वाजता संस्थेच्या गोकुळ शिरगाव येथील प्रधान कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. गोकुळच्या एकूण २५ नवनिर्वाचित संचालकांपैकी सभेसाठी केवळ १३ संचालकच उपस्थित राहिले, तर महायुतीचे सर्व १२ संचालक गैरहजर राहिले.

विधानपरिषद निवडणुकीत महायुतीची मोठी पिछेहाट; आता आरोपांच्या फैरी

..तर पाचही जागा जिंकल्या असत्या; भाजपाने फोडले शिंदेसेनेवर खापर!

मुंबई,दि.२९– विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत केवळ एका जागेच्या हव्यासापोटी शिंदेसेनेने मित्रपक्षांना अडचणीत आणले. महायुतीचा धर्म पाळून शिंदेसेनेने भाजपा आणि अजित पवार राष्ट्रवादीला सहकार्य केले असते तर विधानपरिषदेच्या सर्व पाचही जागा महायुतीने जिंकल्या असल्या असे म्हणत भाजपाने पदवीधर मतदारसंघातील मोठ्या पराभवाचे खापर शिंदेसेनेवर फोडले आहे. एका जागेसाठी मित्रपक्षांचे नुकसान करण्याची भूमिका महायुतीच्या हिताची नाही अशी बोचरी टीका भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केली. अमरावती शिक्षक मतदार संघात आमच्या काहींनी बंडखोरी केली. आम्ही त्यांना पक्षातून बडतर्फ केले. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपाला मतदान करू नका असे सांगणाऱ्या रवींद्र धंगेकर यांच्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अशी भूमिका घेणार का? असा सवालही बन यांनी केला आहे.

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीला अवघ्या दोन जागांवर समाधान मानावे लागले तर विरोधी महाविकास आघाडीने तीन जागा जिंकत महायुतीला मोठा धक्का दिला. भाजपासाठी प्रतिष्ठेच्या नागपूर आणि पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला. संभाजीनगर पदवीधर म्हणून मतदारसंघातही सत्ताधारी अजित पवार राष्ट्रवादीला पराभव पत्करावा लागला. पदवीधर मतदारसंघांच्या तिन्ही जागांवर झालेला पराभव महायुतीच्या विशेषत: भाजपाच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. याबाबत भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आज पत्रकार परिषद घेत महायुतीच्या या पराभवाचे खापर शिंदेसेनेवर फोडले. एका जागेच्या हव्यासापोटी शिंदेसेनेने मित्रपक्षांना अडचणीत (पान ३ वर)



ज्येष्ठ नेते आणि मा. नगरसेवक

कै. अंबादास महादेव अस्वर (पंधाडे)

॥ यांना भावपूर्ण श्रद्धांजली ॥

स्वर्गवास: बुधवार,दि. २१/१०/२०२६

दशक्रिया विधी

शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६
वेळ: सकाळी ८ वाजता

ठिकाण: अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर

दुखांकित

आमदार संग्राम अरुणकाका जगताप